# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र. मु.का.अ./ झोपुप्रा/१५४३/२०१८
दिनांक : ११/०७/२०१८

## कार्यालयीन सूचना:

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत पुनर्वसन घटकांच्या इमारतींचे बांधकाम जलद गतीने कसे होईल यासाठी काय उपाययोजना करता येतील या दृष्टीकोनातून आम्ही वारंवार विचार करत असतो, संबंधित अधिकाऱ्यांना (CEO's Round Table Confernace) मध्ये वारंवार सूचना देत असतो. पुनर्वसन करावयाच्या इमारतींच्या बांधकामाला झोपडपट्टी पुर्वसन प्राधिकरणाकडून कोणत्याही परिस्थितीत विलंब होऊ नये याची काळजी आपणा सर्वांना आहेच .

पुनर्वसन प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टिने जलद गती कशी देता येईल माझ्याकडे येणाऱ्या भागधारक (स्टेक होल्डर्स) यांच्याशी वारंवार चर्चा केली असता अशी तक्रार पुढे आली आहे अभियांत्रिकी विभागाशी संबंधित नस्तींवर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून क्वेरीज उपस्थित केल्या जातात, त्यांना अभियांत्रिकी विभागाकडून परत उत्तर देऊन नस्ती सादर केली जात नाही व संबंधित नस्त्या दीर्घकाल प्रलंबित ठेवल्या जातात.

याबाबतीत विहित वेळेतच कार्यवाही केल्यास पुनर्वसन घटकांच्या इमारतींचे प्रस्ताव वेळेत निकाली काढल्यास गती मिळेल आणि पुनर्वसन घटकातील लाभधारकांना तक्रारी करण्यास वाव मिळणार नाही.

तिन्ही उपमुख्य अभियंत्यांना स्पष्ट सूचना करण्यांत येत आहेत, की आतापर्यंत अभियांत्रिकी विभागाच्या ज्या ज्या नस्त्यांवर माझ्याकडून कांही क्वेरीज काढण्यांत आलेल्या आहेत, अशा सर्व क्वेरीजच्या उत्तरांसह पुढील ५ दिवसांत नस्त्या सादर करण्यांत याव्यात. दि १८ जुलै २०१८ रोजी संध्याकाळी माझ्या कार्यालयात याबाबत सखोल आढावा घेणार आहे.

अभियांत्रिकी विभागाने माझ्या कार्यालयाकडून ज्या नस्त्यांवर क्वेरीज केलेले आहेत/भविष्यात केले जातील असे प्रस्ताव विनाविलंब उत्तर देऊन मला सादर करणे आवश्यक आहे. तसे न करता अभियांत्रिकी विभागामध्ये प्रस्ताव पडून असल्याची गंभीर तक्रार भागधारकांनी (स्टेक होल्डर्स) यांनी माझ्याकडे केलेली आहे.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

सदर तक्रारीची मी गंभीर दखल घेतली असल्याची संबंधित अभियंत्यांनी नोंद घ्यावी. उपप्रमुख अभियंता १, उपप्रमुख अभियंता २, आणि ठाणे यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या अभियंत्यांकडून माझ्या क्वेरीजच्या उत्तर देऊन प्रलंबित नस्त्यांचा आढावा घ्यावा.

येथून पुढे माझ्या कार्यालयाकडून जर क्वेरीज उपस्थित करण्यांत आल्या तर उपमुख्य अभियंता १, उपमुख्य अभियंता २, आणि उपमुख्य अभियंता/ठाणे यांना सूचना देण्यात येते की उपस्थित केलेल्या क्वेरीज, मुद्यांचे निराकरण करून अशा नस्त्या मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत मला परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. अन्यथा याची गंभीर दखल घेण्यात येईल.

तसेच माझे कार्यालय अशा क्वेरीजची नोंद एका वेगळया नोंद वहीत करतील आणि जर वर नमूद केलेल्या विहीत वेळेत नस्ती प्राप्त झाली नाही तर त्याची माहिती माझ्या निर्देशनास आणतील.

सर्व अभियंत्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, दिनांक २१/०७/२०१८ रोजी अभियंत्यांसोबत असलेल्या बैठकीमध्ये याचा सखोल आढावा घेण्यात येईल.

(दीपक कपूर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रती:

१. उपमुख्य अभियंता/ झोपुप्रा १, २ /ठाणे

२. कार्यकारी अभियंता झोपुप्रा सर्व/ठाणे

३. सहाय्यक अभियंता झोपुप्रा सर्व/ठाणे

४. दुय्यम अभियंता झोपुप्रा सर्व/ठाणे

प्रत माहितीसाठी रवाना:

१. सचिव /झोपुप्रा

२. वित्त नियंत्रक/झोपुप्रा

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in